राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव
मंडळांना पुरस्कार देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०२२/प्र.क्र.१३३/सां.का.२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ ऑगस्ट, २०२२

**प्रस्तावना :**

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक गणेशोत्सवासंदर्भात दि.२१.७.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याचे व त्याअनुषंगाने सांस्कृतिक कार्य विभागाने कार्यवाही करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यासाठी कार्यपध्दत ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दि.३१.८.२०२२ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. सदर पुरस्कार देण्यासाठी निवड करण्यासाठी कार्यपध्दत पुढीलप्रमाणे राहिल -

१) या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल.

२) पुढील निकषाच्या आधारे पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल:-

| अ.क्र. | गुणांकनासाठी बाबी | गुणांक |
|---|---|---|
| १. | पर्यावरणपुरक मूर्ती | १० |
| २. | पर्यावरणपुरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टीक इ. साहित्य विरहीत) | १५ |
| ३ | ध्वनीप्रदुषण रहित वातावरण | ५ |
| ४. | पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक सलोखा, इ. समाज प्रबोधन विषयावर देखावा /सजावट | २० |
| ५ | स्वांतत्र्याचा चळवळीसंदर्भातील देखावा/सजावट | २५ |
| ६. | रक्तदान शिबीर,वैद्यकीय सेवा शिबिर इत्यादी कार्य (अनु. क्रमांक ७ व ८ व्यतिरीक्त) | १० |
| ७ | शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक/आरोग्य/सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य | १० |

| | | |
|---|---|---|
| ८. | महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक/आरोग्य/सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य | १० |
| ९. | पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्पर्धा | १० |
| १०. | पारंपारिक/देशी खेळाच्या स्पर्धा | १० |
| ११. | गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा (पाणी/प्रसाधनगृहे, वैद्यकीय प्रथमोपचार, परिसरातील स्वच्छता, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे नियोजन, आयोजनातील शिस्त इ. (प्रत्येक सुविधेस ५ गुण) | २५ |
| | **एकूण** | **१५०** |

३) वरील बाबींची पूर्तता करणाऱ्या/करु शकणाऱ्या गणेशोत्सव मंडळाने करावयाच्या अर्जाचा नमुना, या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये आहे, तसेच राज्य शासनाचे संकेत स्थळ www.maharashtra.gov.in,पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे संकेत स्थळ www.pldeshandekalaacademy.org व दर्शनिका विभागाचे संकेत स्थळ https://mahagazetteers.com वरही उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) सदर अर्ज व सहभागासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

५) सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळाने सदर अर्ज भरुन mahotsav.plda@gmail.com या ईमेलवर दि.३०.८.२०२२ पूर्वी ऑनलाइन पाठवावेत.

६) प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी मुंबई यांनी सदर अर्जाची जिल्हानिहाय विभागणी करुन सबंधित जिल्हाधिकारी यांना त्यांच्या ईमेलवर दि.१.९.२०२२ पूर्वी उपलब्ध करुन द्यावेत. याकरीता प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र ईमेल तयार करुन प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना त्यांच्या pldeshpande१११@gmail.com ईमेल वर कळवावे.

७) विजेत्यांची निवड करण्यासाठी पुढील प्रमाणे जिल्हास्तरीय समिती राहिल:

(१) जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी - अध्यक्ष
(२) शासकीय /शासन मान्य कला महाविद्यालयाचे प्रतिनिधी - सदस्य
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी - सदस्य
(४) आरोग्य अधिकारी - सदस्य
(५) संबधित जिल्ह्यातील पोलीस अधिकारी - सदस्य

त्या त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे वरील अधिकाऱ्यांचे नियुक्ती व त्यांचे समन्वय करतील. सदर निवड समिती गणेशोत्सव उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देतील. व्हिडीओ व आवश्यक कागदपत्र गणेशोत्सव मंडळाकडून प्राप्त करुन घेतील. ही समिती प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत वरील तक्त्यानुसार गुणांकन करुन त्यातील एका उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस करुन त्यांच्या संबधित कागदपत्रे, व्हिडीओ व गुणांकन राज्य समितीकडे दि.१३.९.२०२२ पर्यंत सादर करतील.

८) जिल्हास्तरीय समितींकडून शिफारस केलेल्या ३६ गणेशोत्सव मंडळामधून ३ विजेते निवडण्यासाठी राज्यस्तरावर खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्यात येत आहे :-

(१) सर जे.जे. कला विद्यालयाचे अधिष्ठाता / वरिष्ठ प्राध्यापक

(२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील वरिष्ठ गट-"अ" मधील अधिकारी

सदर समितीने स्वतंत्र ईमेल तयार करावा. सदर समितीसाठी प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी हे समन्वयक राहतील.

सदर राज्यस्तरीय समिती, ही जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येकी एक याप्रमाणे ३६ शिफारस प्राप्त गणेशोत्सव मंडळामधून कागदपत्र, व्हिडीओ व गुणांकन याच्या आधारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांची निवड करतील. सदर नावे बंद लिफाफयातून सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय यांना सुपुर्द करतील.

२. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या गणेशोत्सव मंडळाचा शासनाकडून पुढीलप्रमाणे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल:

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|
| रु. ५,००,०००/- | रु.२,५०,०००/- | रु.१,००,०००/- |

तसेच राज्य समितीकडे ३६ जिल्ह्यातील १ याप्रमाणे ३६ प्राप्त शिफारशीत गणेशोत्सव मंडळापैकी ३ विजेते गणेशोत्सव मंडळ वगळून उर्वरित ३३ गणेशोत्सव मंडळाचाही राज्य शासनाकडून रु.२५,०००/- पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल. सदर ३३ गणेशोत्सव मंडळाच्या पारितोषिकासाठी होणारा खर्च सामाजिक दायित्व निधी अथवा प्रायोजकाद्वारे करण्यात येईल.

३. जिल्हाधिकारी तसेच माहिती जनसंपर्क महासंचालनालयाअंतर्गत कार्यालयांनी सदर उपक्रम सर्व गणेशोत्सव मंडळांना अवगत होण्याच्या दृष्टीने प्रसिध्दीसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. निकालाचा दिनांक, सर्व विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बक्षीस वितरणाचा समारंभाचा दिनांक व ठिकाण याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

५. निवड समितीमध्ये असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना दैनिक भत्ता व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहिल. त्यासाठी होणारा खर्च संबधित कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चातून भागवावा.

६. या कार्यक्रमासाठी अपेक्षित रु. १२,८०,०००/- (रु. बारा लाख ऐंशी हजार फक्त) खर्चास व सदर रक्कम वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. हा खर्च "मागणी क्रमांक झेडडी-०२, (०७) कला अकादमी(०७)(०१) पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी( २२०५१४६३)-५० इतर खर्च (अनिवार्य)" या लेखाशीर्षाखाली सन २०२२-२३ मध्ये मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात येईल.

७. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०८२६११४३५५१६२३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विद्या वाघमारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१०. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई
११. सर्व पोलीस आयुक्त
१२. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१३. अधिष्ठाता, सर जे. जे. कला महाविद्यालय, मुंबई
१४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
१५. प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई
१६. सर्व जिल्हा माहिती अधिकारी
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१८. महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२१. निवड नस्ती (सां.का.१)

परिशिष्ट अ

उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार, २०२२

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने भरावयाचा अर्जाचा नमुना

जिल्हा : -------    तालुका : ---------

| अनु.क्र. | बाब | मंडळाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे नाव | |
| २ | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांची नावे व भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यांची माहिती देण्यात यावी. | |
| ३ | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (पत्ता सविस्तर लिहावा, निवड समितीला शोधावयास सोपे होईल) | |
| ४ | उत्सव स्थळ | |
| ५ | धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केल्याबाबतचा तपशील किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची परवानगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतल्याचा तपशील (त्याची प्रत सोबत पाठवावी) | |
| ६ | पर्यावरणपुरक मूर्ती आहे किंवा नाही<br>असल्यास तपशील दयावा | |
| ७ | पर्यावरणपुरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टीक इ. साहित्य विरहीत) आहे किंवा नाही, असल्यास तपशील दयावा | |
| ८ | ध्वनीप्रदुषण रहित वातावरण आहे किंवा नाही | |
| ९ | पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक सलोखा, इ. समाज प्रबोधन विषयावर देखावा /सजावट - आहे किंवा नाही कोणती संकल्पना आहे त्याचा तपशील दयावा | |
| १० | स्वांतत्र्याचा चळवळीसंदर्भातील देखावा/सजावट- आहे किंवा नाही, असल्यास तपशील दयावा | |
| ११ | रक्तदान शिबीर,वैद्यकीय सेवा शिबिर इत्यादी कार्य (अनु. क्रमांक १२ व १३ व्यतिरीक्त) - आहे किंवा नाही, असल्यास तपशील दयावा | |
| १२ | शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक/आरोग्य/सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य - आहे किंवा नाही, असल्यास तपशील | |

| | | |
|---|---|---|
| | दयावा | |
| १३ | महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक/आरोग्य/सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य, आहे किंवा नाही, असल्यास तपशील दयावा | |
| १४ | पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत किंवा कसे, असल्यास तपशील दयावा | |
| १५ | पारंपारिक/देशी खेळाच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत किंवा कसे, असल्यास तपशील दयावा | |
| १६ | गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा (पाणी/प्रसाधनगृहे, वैद्यकीय प्रथमोपचार, परिसरातील स्वच्छता, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे नियोजन, आयोजनातील शिस्त इ.) | |
| १७ | अन्य काही माहिती दयावयाची असल्यास | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे नमूद करण्यात आलेली माहिती ही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अभिलेख्यानुसार अचूक व खरी आहे. ही माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास आमच्या मंडळाला स्पर्धेतून बाद केल्यास ते आम्हांस मान्य राहिल.

(अध्यक्ष/सचिव/कोषाध्यक्ष यांचे नाव व स्वाक्षरी)